International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.4 Mar – Apr 2022

# स्थलांतरीत ऊसतोड हंगामी मजूरांच्या मूलभूत समस्या : एक नमुना अभ्यास

**अनिल गिरीधर कांबळे,**
**निशिकांत विलास कांबळे**
*विद्यार्थी,*
*एम्.ए./एम्.एस्सी. भूविज्ञान भाग २,*
*मिरज महाविद्यालय, मिरज*

**एस. एम. बागवान**
*सहाय्यक प्राध्यापिका,*
*भूविज्ञान विभाग,*
*मिरज महाविद्यालय, मिरज*

**प्रस्तावनाः**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या देशात महाराष्ट्र राज्य कृषी उत्पादनामध्ये अग्रेसर आहे. विशेषतः ऊस व साखर उत्पादनात पश्चिम महाराष्ट्राने देशामध्ये सहकार चळवळीच्या माध्यमातून नाव मिळविलेले आहे. या क्षेत्रातील साखर कारखान्यांमध्ये काम करणारे ऊसतोड व वाहतूक करणारे मजूर हे मराठवाडा व विदर्भातून हंगामी स्थलांतरीत होऊन आलेले असतात. त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यापैकी याठिकाणी कांही मुलभूत समस्यांचा प्रस्तूत शोधनिबंधासाठी विचार केलेला आहे. सदरच्या अभ्यासासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील दोन साखर कारखान्यांचा नमुना अभ्यास म्हणून निवड केलेली आहे. अभ्यासलेल्या मुलभूत समस्यांवर केलेल्या उपाययोजनाही या शोधनिबंधात सुचविलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य हे देशातील साखर उत्पादनात व साखर उतारा (Recovery) मध्ये अग्रेसर आहे. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात ‘शर्करा कुंभ’ (Sugarbowl) म्हणून ओळखले जाते (गायकवाड १९९३). १९६० नंतर भारतात हरितक्रांती झाली. याचाच भाग कृष्णा व पंचगंगा नदीच्या खोयातील शेतीच्या जलसिंचनाचा विकास झाला. यामुळे बागायती पिकांचे क्षेत्र वाढले आणि याचमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुका हा कृषीक्षेत्रातील सधन व समृध्द तालुका म्हणून ओळखला जातो. याच तालुक्यातील श्री.दत्त व श्री.गुरुदत्त साखर कारखान्यांची

निवड प्रस्तुत शोध निबंधासाठी केलेली आहे. या गाळप हंगामात ऊस तोड मजूरांचा जिल्हा म्हणून ओळख असणाया बीड जिल्ह्यातून मजूरांच्या टोळ्या या कारखान्यात हंगामी स्थलांतरीत झालेले आहेत. साधारणपणे दस-यापासून कारखान्याचा पट्टा पडेपर्यंत हे मजूर सहा-सात महिने असतात. तेव्हा या कालावधीत त्यांना अनेक मूलभूत समस्यांना तोंड द्यावे लागते. याच समस्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

**पारिभाषिक शब्दः** पाल, टोळी, कोयता, अर्धा कोयता, उचल, साखरशाळा, गाडीसेंटर, वाढे, डोकी सेंटर, बसपाळी, कंत्राटदार, मुकादम, चिटबॉय.

**उद्दिष्टः**

प्रस्तुत शोध निबंधासाठी ‘‘स्थलांतरीत हंगामी ऊसतोड मजूरांच्या मूलभूत समस्यांचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.

**अभ्यास पध्दतीः**

हंगामी ऊसतोड मजूरांच्या मूलभूत समस्यांचा आढावा घेताना त्यांच्या परिस्थीतीचा व भौगोलिक परिस्थीतीवर असून याचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पध्दती, निरीक्षण पध्दती व मुलाखत पध्दती यांचा अवलंब केलेला आहे. स्थलांतरित ऊसतोड मजूरांचा अभ्यास करण्यासाठी श्री.दत्त शेतकरी सह.साखर कारखाना लि. शिरोळ व श्री.गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी, ता.शिरोळ या कारखान्याशी संलग्न असणाया मजूरांची निवड केली आहे. ह्या मजूरांचे वस्तीस्थान हे साखर कारखाना शेजारी परिसरात असून सर्वेक्षण व निरीक्षण करणे सोयीचे होते. या दोन्ही ठिकाणी ऊसतोड कामगारांचे निरिक्षण, मुलाखत व प्रश्नावलीच्या सहाय्याने केले. सदरच्या माहिती संकलनासाठी सन २०२०-२१ हा ऊसतोड हंगाम निवडलेला आहे.




(आकृती १)

**अभ्यास क्षेत्रः**

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील श्री.दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोळ व श्री.गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी या दोन कारखान्यांच्या प्रभावक्षेत्राची निवड अभ्यासक्षेत्र म्हणून निवड केलेली आहे (आकृती १). सदर कारखान्यांना गाळपासाठी पुरवठा होणारा ऊस शिरोळ तालुका, सांगली जिल्ह्यातील मिरज तालुका त्याचप्रमाणे उत्तर कर्नाटकातील कागवाड, अथणी, रायबाग, चिक्कोडी, निपाणी या तालुक्यातील क्षेत्रातून येतो. ऊस क्षेत्रातून ऊस तोडून कारखान्यांपर्यंत आणण्याची जबाबदारी टोळीमालक, ऊस तोडणी मजूरांवर असते. या कार्यात स्थानिक ऊसतोड मजूरांचा देखील समावेश असतो.

सदरच्या कारखान्याचे ठिकाण हे कोल्हापूर जिल्ह्याच्या पूर्वेस कर्नाटक सीमेलगत आहे. या ठिकाणांचे निरपेक्ष स्थान श्री.दत्त कारखाना १६°७४’८९’’ उत्तर अक्षांश आणि

७४°५८'८८'' पूर्व रेखांश, श्री.गुरुदत्त १६°६२'१९'' उत्तर अक्षांश आणि ७४°५९'८१'' पूर्व रेखांश असे आहे.

**समस्यांचे विश्लेषणः**

**राहण्याचे ठिकाण**: ऊस तोड मजूरांचे राहण्याचे ठिकाण कारखान्याजवळच आसपास असते. १० १० च्या जागेत प्रत्येक कुटूंबाला सोय करुन दिलेली असते. कारखान्याकडून बांबू, बांबूच्या बो-या (चटया) दिल्या जातात. त्याचप्रमाणे नारळाच्या झावळ्या, ताडपत्री यांच्यापासून खोपी/पाल तयार केली जाते. बाजूलाच जनावरांना बांधले जाते. कारखाना परिसरातील प्रदुषण व हवामानाच्या अनेक स्थित्यंतरांना त्यांना तोंड द्यावे लागते.

**स्वच्छ पाणीपुरवठा**: कारखाना कार्यस्थळावर पाणी हे तात्पुरत्या स्वरुपात टँकरने पुरविले जाते. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी सोय केली जाते. त्याचप्रमाणे ऊस तोडणीस गेल्यावर एखादी विहीर, आसपासची नदी, ओढा, चेंबर इत्यादीमधील दूषित पाणीच प्यावे लागते. जनावरांनासुध्दा तेच पाणी पाजावे लागते. त्यामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवतात.

**शौचालय समस्या**: कारखाना क्षेत्रात मजुरांना शौचालयास उघड्यावरच मोकळ्या माळरानावर अथवा काटेरी झुडूपांत बसावे लागते. त्यामुळे कालांतराने दुर्गंधी पसरते.

**विजेची समस्या**: कारखाना शेजारी ऊसतोड मजूरांना राहण्याच्या ठिकाणी विजेची सोय नसते. स्थानिक लोकांकडून काहीजण स्वतः सोय करतात. त्यांच्या विजेरी, मोबाईल हे एखाद्या दुकानात अथवा गाडीतळ/वजनकाटा येथे चार्जिंग करावे लागते. जिथे ऊस तोडतात त्याच परिसरातसुध्दा कांहीवेळा रहावे लागते. तिथे कोणत्याच सुविधा नसतात.

**स्थलांतर**: बीड जिल्हा हा अवर्षणप्रणव क्षेत्रात येत असल्याने अनियमित पाऊस व सततचा दुष्काळ यामुळे तेथील शेती पावसावर अवलंबून असल्याने कोरडवाहू पीके घेतली जातात. परंतु पुरेश्या प्रमाणात त्यांना रोजगार अथवा हाताला काम नसल्याने उचल घेवून ऊसतोड करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रात येतात. त्यांच्या एक माणूस तोडणीस असल्यास अर्धा कोयता व जोडीने असल्यास एक कोयता म्हटले जाते.

**आरोग्य समस्या**: ऊस तोड कामगार हा ऊस तोडीसाठी त्याला भरपूर लांबपर्यंत जाऊन ऊस तोडावा लागतो. व परत गाडीसेंटरवर येवून नंबर लावावा लागतो. यामुळे त्याला पहाटे तीन

पासून जागे राहून काम करावे लागते. पहाटे ३ पासून दुपारी ३ पर्यंत १२ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांची झोप पूर्ण होत नाही. तसेच विश्रांती मिळत नसल्याने त्यांना थकवा जाणवतो. यामुळे त्यांना निद्रानाश, व्यसनाधीनतेमुळे पित्ताचा त्रास, अंगदुखी, पोटदुखी, सांधेदुखी, डेंग्यू, मलेरीया, डायरीया इ. आजार मोठ्या प्रमाणात होतात.

**धर्म-जातः** ऊस तोड मजूर हा स्थलांतरीत झाल्यावर तो ऊसतोड मजूर असतो. हे टोळीने राहतात व काम करतात. प्रामुख्याने वंजारी, मराठा, धनगर, लमाण, मराठा, मातंग, चांभार, महार, वरूल, होलार या जातीचे लोक एकत्रित राहतात. ते कोणताही भेदभाव मानत नाहीत.

तक्ता क्र.१ श्री. दत्त कारखाना, शिरोळ परिसरात बीड जिल्ह्यातून सुमारे १०५० मजूरांचे कुटूंब आले असुन यांत बंजारा /लमाण ४४०, मराठा ३२५, धनगर ८०, होलार ७०, मातंग २०, महार ३०, चांभार २५, गुजर ३०, वरुल ३०, कुटूंबे आहेत.

**तक्ता क्र.१ : श्री.दत्त सहकारी साखर कारखान्याचे ऊसतोड मजूरांचे वर्गीकरण.**

| जिल्हा | बंजारा | मराठा | धनगर | होलार | मातंग | महार | चांभार | गुजर | वरुल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बीड | ४४० | ३२५ | ८० | ७० | २० | ३० | २५ | ३० | ३० |

तक्ता क्र.२ श्री.गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी या ठिकाणी ६१० कुटूंबे स्थलांतरीत असून तो सर्व बीड जिल्ह्यातून आली आहेत. यांत बंजारा /लमाण २५०, मराठा १४०, धनगर ८५, होलार २५, मातंग ३०, महार २५, चांभार २०, गुजर १०, वरुल २५ कुटूंबे आहेत.

**तक्ता क्र.२ : श्री. गुरुदत्त शुगर्स मधील ऊसतोड मजूरांचे वर्गीकरण**

| जिल्हा | बंजारा | मराठा | धनगर | होलार | मातंग | महार | चांभार | गुजर | वरुल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बीड | २५० | १४० | ८५ | २५ | ३० | २५ | २० | १० | २५ |

**निष्कर्षः**

श्री.दत्त सह. साखर कारखाना शिरोळ व श्री.गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी या कारखान्यात हंगामी ऊसतोड व ऊसवाहतूकीचे काम करणारे मजूर आहेत. याशिवाय

कारखान्याशी संलग्नीत असणारे ऊसतोड मजूर हे कारखान्याचा अविभाज्य घटक आहेत. या मजूरांचे सर्वेक्षण व अभ्यास केल्यानंतर खालील निष्कर्ष काढता येतील.

या कारखान्यांच्या परिसरात राहत असणारे मजूरांच्या सोयीसुविधा ह्या अत्यल्प असलेल्या निदर्शनास आल्या व त्यांच्या मुलांसाठी साखरशाळा, पिण्याचे पाणी इ. सुविधा उपलब्ध होत्या. परंतू परिसर अस्वच्छ व शौचालय असुविधा आढळल्या. बहुतांश कुटूंबातील व्यक्ती या अशिक्षीत होत्या, पर्यायी नोकरी नाही. अवर्षण या कारणाने कुटूंबातील सर्वच व्यक्ती ऊस तोडणीसाठी आले आहेत.

उचल घेतलेने मजूर हे उचल न फीटल्याने कर्जबाजारी होतात. अशिक्षीतपणा यामुळे व्यसनाधीनतेचे प्रमाण जास्त आढळते. यांना विजेची समस्या, आरोग्य सुविधा कामाची वेळ, महिलांविषयीच्या समस्या, शौचालय, स्नानगृह इ. मूलभूत समस्याची कमतरता आहे.

**उपाययोजना**:

ऊसतोड मजूर कारखान्याचे स्थलांतरीत मजूर न समजता कायमस्वरुपी मजूर/कामगार म्हणून स्वीकारावे. त्यांच्या मुलांसाठी कायमस्वरुपी साखरशाळेची सोय करावी.

लहान बाळांना सांभाळण्यासाठी पाळणाघर सुविधा असावी. त्यांच्या मूलभूत सोयी सुविधांची पूर्तता करण्यात यावी. त्यांच्या म्हातारपणीचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटवण्यासाठी निवृत्ती वेतन सोय करावी. त्यांना हंगामात धान्य रेशन मिळावे, सौरदिवे उपलब्ध व्हावेत.

**संदर्भ :**

१) गायकवाड एस्. बी.(१९९३) : *"Post independence Growth of Sugar Industry in Maharashtra : A Geographical Appraisal", unpublished M. Phil. dissertation submitted to Shivaji University, Kolhapur.*

२) लवटे, पाटील व जाधव (२०१९) : *"वसंतदादा सहकारी साखर कारखान्यातील ऊसतोड कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्या : एक अभ्यास", २०१९ IJRAR, मार्च २०१९, खंड ६, अंक १, पा.नं.२३५ ते २३८.*